सकाळ | नगर

मंगळवार । १२ मे । २००९

TODAY

# संमेलनाध्यक्षपदी डॉ. जाधव

## नवोदितांचे संमेलन : संगमनेर येथे आयोजन

सकाळ वृत्तसेवा



डॉ. जाधव नरेंद्र

नगर, ता. ११ : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेतर्फे सोळावे अखिल भारतीय नवोदित मराठी साहित्य संमेलन येत्या ३० व ३१ मेदरम्यान संगमनेर येथे होत असून, या संमेलनाच्या अध्यक्षपदी पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. नरेंद्र जाधव यांची निवड झाली आहे. तसेच, या संमेलनाचे स्वागताध्यक्ष डॉ. सुधीर तांबे, तर स्वागत कार्याध्यक्ष म्हणून डॉ. संजय मालपाणी यांची निवड करण्यात आली आहे.

संगमनेरच्या मालपाणी लॉन्समध्ये हे साहित्य संमेलन होणार आहे. ता. ३० रोजी सकाळी ग्रंथदिंडीने प्रारंभ होणार असून, दोन दिवसांच्या या संमेलनात पुरस्कार वितरण, पुस्तक प्रकाशन, चर्चासत्र, परिसंवाद, कविसंमेलन, कथाकथन व प्रकट मुलाखती आदी साहित्यिक कार्यक्रम होणार आहेत. 'महाराष्ट्रातील विविध बोलीभाषा : संस्कृती व इतिहास' आणि 'सामाजिक परिवर्तनाची दिशा : सद्य परिस्थिती व भवितव्य' या दोन विषयांवर परिसंवाद, तसेच 'मराठी भाषेसमोरील आव्हाने' आणि 'प्रसारमाध्यमे : किती तारक-किती मारक' या दोन विषयांवर चर्चासत्रे होणार आहेत. देशभरातून सुमारे बाराशे लेखक-कवी संमेलनास येणार आहेत.

साहित्य परिषदेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष शरद गोरे, उपाध्यक्ष राजकुमार काळभोर, विश्वस्त किशोर टिळेकर, जिल्हाध्यक्ष रमेश शिंदे, तसेच अमोल बागूल, मोहन क्षत्रिय, ॲड. रंजना गवांदे, सुनील कडलग, प्रा. जवाहर मुथा आदींनी या संमेलनाचे नियोजन केले आहे. साहित्य परिषदेची आतापर्यंत १५ संमेलने झाली असून, शिवाजी सावंत, वसंत बापट, मंगेश पाडगावकर, नारायण सुर्वे, सुरेश भट, रा. रं. बोराडे, डॉ. गंगाधर पानतावणे, प्रा. इंद्रजित भालेराव, प्रा. रतनलाल सोनग्रा, डॉ. जनार्दन वाघमारे, डॉ. विठ्ठल वाघ आदींनी संमेलनाध्यक्षपद भूषविलेले आहे.

### निःशुल्क ग्रंथविक्री स्टॉल

**संगमनेरच्या संमेलनात प्रकाशकांना ग्रंथविक्रीसाठी निःशुल्क स्टॉल देण्यात येणार असून, संमेलनास येणाऱ्या लेखक-कवींना निवास, भोजन व चहा-नाश्ता सुविधाही निःशुल्क दिली जाणार आहे. सहभागी प्रत्येक साहित्यिकास स्मृतिचिन्ह व प्रशस्तिपत्र देऊन गौरविले जाणार आहे. अधिक माहितीसाठी ९९२२९८६३८६ व ९७६३४५३६०७ या दूरध्वनींवर संपर्क साधावा.**